७५८

१५१६

(७८)

३५८

<u>जमीन एकत्रीकरण योजनेवरील</u>
<u>कर्मचाऱ्यांना अन्य कामे देण्याबाबत.</u>

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
निर्णय क्र. सिओएन १०८३/२११६२३/२९५२-ल१,
मंत्रालय, मुंबई -३२ दिनांक १० मार्च १९८३

१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. सिओएन १०७७/४०५३५/८०६-ल१
दिनांक ११ फेब्रुवारी १९८० व

२) शासन पत्र, महसूल व वन विभाग क्र. एस-१४/३३९४२/२०७४-ल१,
दिनांक १७ ऑगस्ट १९८२ पहावे.

<u>शासन निर्णय:-</u> शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. एस-१४/१०८२/६४७९-म५ दिनांक ५ ऑक्टोबर १९८२ अन्वये शासनाने महसूल विभागाशी संबंधीत विविध बाबींचा अभ्यास करून शासनास अहवाल सादर करण्यासाठी सचिव(महसूल व पुनर्वसन) ह्यांचे अध्यक्षतेखाली एक उच्चाधिकार समिती नियुक्त केली आहे. या समितीच्या दिनांक ३ जानेवारी १९८३ च्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयानुसार उपरोल्लेखित आदेश रद्द करून खालील नमूद केलेले व्यापक स्वरूपाचे आदेश देण्यात येत आहेत.

ज्या गांवात एकत्रीकरण योजनेचे काम चालू आहे अशा गावात खाली नमूद केलेली कामे एकत्रीकरण योजनेवरील कर्मचाऱ्यांना देण्यात यावीः-

अ) भूसंपादन व कोर्टवाटप या कामास अग्रक्रम दिल्याने प्रत्येक जिल्ह्यात अर्जावरून हद्द कायम करण्यासाठी शेतकऱ्याने दिलेल्या अर्जांचा विलंबाने निपटारा होतो, अशी कामे

ब) सन १९७१-७४ या कालावधीत दुष्काळी कामानिमित्त शासनाकडून अनेक रस्ते, पाझर तलाव व मायनार इरिगेशन इ. कामे हाती घेण्यात आला व ती पूर्णही झाली. परंतु त्यानुसार मोजणी होऊन गांवचे नकाशा व अभिलेख दुरुस्त न झाल्यामुळे जागेवरील प्रत्यक्ष परिस्थिती मूळ नकाशा व अभिलेख यात तफावत आहे. ती पूर्णतः मेळात आणण्याची कामे.

क) गांवी सार्वजनिक उपयोगासाठी जे सरकारी रस्ते नकाशात दाखविलेले आहेत ते गुरचरणाचे स. नं. दोन गावातील शीवा इ. सरकारी जागेवर गावकऱ्यांकडून अतिक्रमण होत आहे. सार्वजनिक उपयोगासाठी ठेवलेल्या सरकारी जागेची मोजणी होऊन त्यावरील झालेली अतिक्रमणे दूर करून जनतेची सोय करण्याची कामे.

ड) जमीन एकत्रीकरण योजनेतील झालेल्या नकाशाच्या फेरफारामुळे [illegible] व बांध पहाणीचे काम पहाणारे महसूल विभागाचे कर्मचारी हे नवीन गटामुळे झालेल्या हद्दीबरोबर करून येत नसलेने व अन्य इतर महत्वाच्या कामामुळे दगडबांध पहाणीचे काम वेळेवर होत नाही. ज्या गावी जमीन एकत्रीकरण योजना पूर्ण झाली आहे अशा बऱ्याच गावात हे काम बऱ्याच मोठ्या प्रमाणावर शिल्लक आहे. शेतकऱ्यांच्या हद्दीबाबतची आपसातील भांडणे व कोर्टकचेरीतील वाद, त्यापायी होणारा खर्च व वेळेचा अपव्यय ~~यांना आळा घालण्याच्या~~ दृष्टीने ही कामे त्वरित हाती घेणे इष्ट आहे.

२. नवीन नकाशाच्या छपाईबाबत पुढील प्रमाणे कारवाई करावी.

अ) एकत्रीकरण योजना तयार केलेल्या सर्व गावच्या नकाशाचे मूळ अभिलेखाशी पडताळणी करून त्यात आवश्यक त्या दुरुस्त्या करून ते नकाशे अद्यावत आणावे. तसेच ज्या गावांचे नकाशे

(कृ. मा. प. हा)

अजून छपाई झाले नसतील त्यांना फेर नकाशे पाठवून अगर पाठविलेले नकाशे परत मागवून त्यात दुरुस्त्या बसवून नंतर ते छपाईसाठी पाठवावे.

ब) त्रुटीचे नकाशे छपाईसाठी पाठविल्याबद्दल संबंधीत कार्यालयाचे निमतानदार व सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांचेकडून स्पष्टीकरण घ्यावे व ज्या अधिकाऱ्यांनी याबाबत निष्काळजीपणा दाखविला असल्याचे दिसून येईल त्यांचेवर आवश्यक ती कारवाई घेतली जावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

सही ×××.
( गं. शं. वणी )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
जमाबंदी आयुक्त व संचालक भूमि अभिलेख पुणे.

75

// खरी नक्कल //